ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन



प्रतिसरकारचे अर्ध्वयू-क्रांतिसिंह नाना पाटील

१९४२ चे चलेजाव आंदोलन : अमृत महोत्सवी वर्ष

ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No.Maharashtra/13482/satara/2010)
E-mail ID : sisms2010@gmail.com

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन

*** Chief Editor ***

Dr.Vishvanath Pawar

*** Co-Editorial Board ***

Dr.Ajitkumar Jadhav
Dr.Jaypal Sawant
Dr.Sumit Yadav
Prof. Mahadev Chinde

**2017**

६५. भगतसिंह –एक क्रांतिपर्व
प्रा.अक्षय प्रकाश नेवे १८४

६६. मानवी हक्क व डॉ.बाबासाहेब आंबेडकर
प्रा.डॉ.जयपाल सांवत १८६

६७. श्री.विश्वनाथ काशिनाथ वाघ यांचे जीवन व कार्य
प्रा.राजेंद्र पांडूरंग महानवर १८९

६८. डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान
प्रा.महेशकुमार पांडुरंग सोनावणे १९१

६९. सत्यशोधक ज्योत्याजीराव फाळके
प्रा.कमलसिंग विक्रमसिंग क्षत्रिय १९४

७०. शिक्षण महर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे आंतरिक संबंध
प्रा.गीतांजली साळुंखे १९७

७१. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व अण्णा भाऊ साठे
श्री.आकश राजाराम चव्हाण १९९

७२. भारत इतिहास संशोधक मंडळातील नाण्यांचा परिचय
प्रीतम कन्हैया महामुनी २०२

७३. किसनराव गंगाराम मोरे यांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदान
प्रा.डॉ.व्ही.व्ही.पाडळकर २०४

# ६६. मानवी हक्क व डॉ.बाबासाहेब आंबेडकर

प्रा.डॉ.जयपाल सांवत
शंकरराव जगताप आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज
वाघोली ता.कोरेगाव,जि.सातारा

कोणतीही एखादी मोठी व्यक्ती सार्वजनिक जीवन कोणत्याही कारणाने सोडून गेली तर त्या व्यक्तीचे केवळ विचार मागे राहतात आणि हे विचारदेखील त्या त्या ठराविक काळापुरतेच मर्यादित राहू शकतात. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, कार्य मात्र त्याला अपवाद आहे. त्यांनी समता, बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य, जागतिक अर्थकारण व राजकारण यांविषयी मांडलेले विचार आजही समर्पक ठरतात. त्यांचे कार्य आजही तेवढेच परिणामकारक व स्फूर्तिदायी ठरते.

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करता असे जाणवते की भारतीय समाजव्यवस्थेने लाथाडलेल्या शुद्र वर्गाला प्राचीन काळापासूनच हिनता सहन करावी लागलेली आहे. भारतीय समाजव्यवस्थेची मांडणीच मुळात अशा सिध्दांतावर करण्यात आलेली आहे की शुद्र वर्ग हा कधीच आपल्या परिस्थितीत बदल करू शकत नव्हता आणि जर असा प्रयत्न कोणी केला तर त्याला अनेक प्रकारच्या शिक्षा दिल्या जात की पुन्हा कोणीही तशा प्रकारचा प्रयत्न करता कामा नये. आणि या पुढे जावून याच समाजाचा अर्धा घटक असणाऱ्या स्त्रीयांनाही या व्यवस्थेने याच बंधनांमध्ये अडकवलेले होते आणि त्यांनाही कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. या बंधनांना तोडण्याचे कार्य छ.शिवरायांपासून झालेले आहे. छ.शिवरायांच्या सोबत असणारी सर्व जातीधर्माचे लोक पाहता राजेंनी या जातीपातींच्या बंधनात न राहता जिवा महाले, शिवा काशिद, बर्हिजी नाईक व मदारी मेहेत्तर या व अशा अनेकांना सोबत घेऊन स्वराज्याचे निर्माण केले. ज्या कालखंडात स्त्री ही उपभोगाची वस्तू म्हणून समजले जात होते त्या कालखंडात छ.शिवाजीराजांनी स्त्रीयांच्या अब्रुला धक्का लावणारा आपला का परकीय आहे याची तमा न बाळगता अतिशय कडक शिक्षा दिलेल्या आहेत. छ.शाहुमहाराजांच्या काळात पेशव्यांचे वर्चस्व वाढत जावून सत्ताकेंद्र सातारहून पुण्यास आले व पुन्हा समाजातील जातीव्यवस्थेच्या कडक नियमांची अंमलबजावणी होण्यास सुरूवात झाली. सन १८१८ साली पुण्याच्या शनिवारवाडयावर युनियन जॅक फडकला आणि सर्व सत्ता इंग्रजांच्या ताब्यात गेली. ब्रिटीशांनी भारतात प्रथमतः शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून १८१३ साली भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रूपयांची तरतुद केली. ही रक्कम जरी तुटपुंजी असली तरीही आजवर जे शिक्षण फक्त उच्चवर्णीयांपर्यंत सिमीत होते ते आता सर्वांसाठी खुले झाले.

सन १८४८ मध्ये म.फुल्यांनी स्त्री शिक्षणाची सुरूवात केली व १८५३ साली त्यांनीच अस्पृश्यांना शिक्षणाची दारे उघडली. सन १८७३ साली म.फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाच्या स्थापनेविषयी व त्याच्या कार्याबाबत एलीनॉर झेलीओट आपल्या महार अ‍ॅण्ड नॉनब्राम्हीण मुव्हमेंट इन महाराष्ट्रा या ग्रंथात म्हणतात, " The purpose was the liberation of the lower classes from the domination of the Brahmins. His anti-Brahmanism was not against the individual Brahmins but against the system of Brahmins."[१].

म.फुल्यांचे नंतर शुद्रातीशुद्रांना नेतृत्व मिळाले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे होय. तत्कालीन प्रखर अशा सामाजिक विषमतेमुळे बालपणीच त्यांच्या मनावर वाईट अनुभव कोरले गेले. पुढे १९१३ ला ते जेव्हा बडोद्याच्या महाराजा सयाजीरव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या आधारे अमेरिकेला गेले, तेव्हा त्यांना अस्पृश्यतेचा काहीच त्रास झाला नाही. भारताचे चित्र आणि अमेरिकेतील चित्र वेगवेगळे दिसून आले. इथे शिवाशिवीचा/अस्पृश्यतेचा प्रश्नच नाही, कोणत्याही प्रकारची मानहानी नाही. अमुक विषय घ्यायचा नाही तमूक विषय घ्यायचा नाही असे कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. कारण अमुकच जातीतील जन्मामूळे केस कापणे, कपडे लाँड्रीला देणे, वाहनात बसू न देणे, शाळांमध्ये शिक्षक दुरून छड्या मारतात असे चित्र अमेरिकेत पहायला मिळत नव्हते. या परस्परविरोधी अनुभवांचा विचार करून त्यांनी आपल्या देशाला व समाजबांधवांना या सामाजिक विषमतेच्या विळख्यातून बाहेर काढायचे मनोमन ठरवले. १९२५ मध्ये कोलंबिया विद्यापिठाने नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया-ए हिस्टॉरिकल अँड अनॅलिटकली स्टडी, या विषयावर संशोधन करून पीएच.डी.ची पदवी प्राप्त केली. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे अध्ययन केले. समतेची मिळालेली अमेरिकेतील वागणूक डॉ.आंबेडकरांच्या मनावर खोलवर बिंबली होती. त्यामुळेच पुढे भारतात आल्यावर त्यांनी समतेवर आधारित समाजरचना घडवण्यासाठी सारे सामाजिक लढे केलेले दिसून येतात. पुढे त्यांनी लंडन येथील विद्यापीठात 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा प्रबंध सादर केला आणि डी.एस्सी. ही पदवी मिळवली.

भारतात आल्यावर सामाजिक विषमता दुर करण्याच्या हेतूने अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाची कैफियत समाजासमोर मांडण्यासाठी, त्यांनी 'मुकनायक' 'बहिष्कृत भारत' 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' अशी वृत्तपत्रे चालवली. या काळात जी काही वृत्तपत्रे महाराष्ट्रात होती, त्यातून अस्पृश्यांचे प्रश्न मांडले जात नव्हते. त्यामुळे (तत्कालीन) अस्पृश्यांसाठी स्वतंत्र वृत्तपत्रांची गरज होतीच.

सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय घडामोडी तसेच नवीन समाजाची निर्मिती या अनुषगांने त्यांनी त्यातून लिखाण केले. वृत्तपत्रांचा वापर त्यांनी

कधीच केवळ आपल्या पक्षाची राजकीय ध्येय धोरणे राबविण्यासाठी केला नाही. स्पृश्य आणि तथाकथित अस्पृश्य अशा दोन्ही समाजांच्या लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य होय. केवळ वृत्तपत्रांमधून नाही तर त्यांनी 'दी अनटचेबल्स' 'शूद्र पूर्वीचे कोण होते?', बुद्धा अँड हिज धम्म' असे ग्रंथ लिहिले. याशिवाय 'थॉटस ऑन पाकिस्तान' हा जागतिक राजकारणावरील ग्रंथदेखील लिहिला. 'रिडल्स इन हिंदुइझम', 'महाराष्ट्र अँज अ लिंग्विस्टिक स्टेट', 'स्टेटस अँड मायनॉरिटीज', 'भारतातील जाती' या ग्रंथांचीही त्यांनी निर्मिती केली.

डॉ.आंबेडकर यांच्यावर संत कबीर, महात्मा जोतिराव फुले व राजर्षी शाहू महाराज या व्यक्तिमत्त्वांचा, त्यांच्या विचारांचा व कार्याचा मोठा प्रभाव होता. डॉ.आंबेडकर हे कर्ते सुधारक होते. सर्व माणसे समान आहेत. कोणीही उच्च किंवा नीच नाही अशी त्यांची ठाम धारणा होती. जातीय उतरंड, चातूवर्ण्य व्यवस्था, या व्यवस्थेत शुद्र मानल्या गेलेल्या जातींवर होणारे अत्याचार यांबाबत त्यांच्या मनात विलक्षण चीड होती. "जातीसंस्थेने हिंदू समाजाचे विघटन व नैतीक अधःपतन केलेले आहे. हिंदू नावाचा समाजच अस्तित्वात नसून ते अठरापगड जातींचे कडबोळे आहे असे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.[२] आपल्या प्रत्येक कृतीतून त्यांनी समानतेचे धडे दिले. कृतीतून त्यांनी समानतेचे तत्त्व बिंबवले. त्यांनी या कृतीतून स्पष्ट केले की शिक्षण घेऊन ते 'सुशिक्षित' झाले असले, तरी समाजबांधवाना ते विसरले नाही. जातीव्यवस्थेवर भाष्य करताना ते म्हणतात "Caste system involves attempt to appoint takes to individuals in advance, selected not on the basis of trained original capacities, but on that of social status of the parents"[3]

डॉ.आंबेडकरांनी १९२७ ला महाडच्या(जि.रायगड) चवदार तळ्यावर अस्पृश्यानादेखील पाणी भरता यावे यासाठी सत्याग्रह केला स्वतः डॉ.आंबेडकर जरी हिंदू देव देवतांना मानत नव्हते तरीही त्यांनी १९३० ला नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह सुरू केला. कारण जर मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला तर त्यामुळे अस्पृश्येतचा प्रश्न सुटण्यास हातभार लागेल, असे त्यांचे मत होते. हे सत्याग्रह केवळ त्या तळ्यापुरते किंवा मंदिरापुरते मर्यादित नव्हते, तर तो लढा सन्मानाने जगण्याच्या हक्कासांठी होता. तो लढा तत्कालीन अस्पृश्यांमधील आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि हक्कांसाठी होता. याचसाठी त्यांनी वर्णव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाचे जाहीर दहनही केले.

१९१७ ते १९३५ या काळात हिंदुधर्मात राहूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला, धर्मसुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पण हे प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत. कमी पडत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. धर्मावर आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, It pains me to see youths growing indifferent towards religions. Religion is not opium as some holds it. What good things I have, have been the benefits of my education to society I owe them to the religions feeling in me. I want religion, but not hypocrisy in the name of religion."[४] तथाकथित उच्चवर्णीय लोक आपल्या वर्तनात व मानसिकतेत बदल करत नाहीत हेही त्यांच्या लक्षात आले म्हणूनच १९३५ मध्ये त्यांनी 'मी हिंदु म्हणून जन्मला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी घोषणा येवला येथे केली. १९५६ मध्ये सुमारे पाच लाख अस्पृश्य बांधवांसह बौद्ध धम्माची दिक्षा घेऊन डॉ.आंबेडकरांनी धर्म-परिवर्तनाची घोषणा प्रत्यक्षात आणली. धर्म आणि धम्म हा काही लोकांना वाटतो तसा केवळ शब्दछल मुळीच नाही यातील मुलभूत फरक डॉ.आंबेडकरांनी सुस्पष्ट केला आहे. धर्म संकल्पनेत ईश्वर केंद्रस्थानी असतो तर धम्मविचारातून नीतीला अग्रस्थान दिलेले असते. भारतीय घटनेतील माणूस आणि व्यवहारात जगणारा माणूस यातील विसंगती दूर करण्याचा प्रयत्न बाबासाहेबांच्या धम्मविचारात अनुस्यूत आहे.[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ जातिव्यवस्थेच्या विरोधातच लढत होते असे नव्हे किंवा ते केवळ विशिष्ट एका समाजाच्या विकासाचाच केवळ विचार करत होते असेही नव्हे. त्यांना भारतीय स्वातंत्र्य लढ्याचेही भान होते. शिक्षण, अंधश्रद्धा, स्त्रियांची स्थिती, अर्थकारण, राजकीय किंवा प्रशासकीय व्यवस्था या मुद्यांकडेही त्यांचे अवधान होते. एकीकडे ते जसे १९३० ते ३२ मध्ये झालेल्या गोलमेज परिषदांतून अस्पृश्यांच्या न्याय व हक्कांसाठी लढतात तसेच दुसरीकडे हिंदु समाजातील स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा, संपत्तीतील हक्क, घटस्फोट इत्यादीबाबत स्वातंत्र्य मिळावे म्हणून हिंदू कोड बील संसदेत मांडतात आणि ते नामंजूर झाले म्हणूनही आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही देतात. आदर्श समाज कसा असावा याबाबत आपले मत व्यक्त करताना डॉ.आंबेडकर म्हणतात, If you ask me, my ideal would be a society based on Liberty, Equality and Fraternity.... In other words there must be social endosmosis. This is fratemity, which is only another name for democracy. Democracy is not merely a form of Government. It is primarily a mode of associated living, of conjoint communicated experience. It is essentially an attitude of respect and reverence towards fellowmen."[६]

त्यांनी राजकीय क्षेत्रातही १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. १९२७ ला सवर्णांच्या अन्याय व अत्याचारापासून पददलितांचे संरक्षण करावे या हेतूने शिस्तबद्ध असे 'समता सैनिक दल' स्थापन केले. १९३६मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, तर १९४२ साली 'अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' स्थापना केली. पुढे अखिल भारतीय स्तरावर रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचे त्यांनी ठरवले होते. परंतु दुर्दैवाने त्यापुर्वीच त्यांचे निधन झाले. १९४७ मध्ये डॉ.आंबेडकरांचा स्वतंत्र भारताचे कायदामंत्री म्हणून पंडित नेहरुंच्या मंत्रिमंडळात प्रवेश झाला व त्याच वर्षी त्यांची भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी व घटना समितीची सभासद म्हणून निवड झाली. राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल भारतीय जनता डॉ.आंबेडकरांना कदापिही विसरणार नाही. विविधतेने नटलेल्या आपल्या भारतात सक्षम संघराज्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. आजच्या काळात गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीतही घटना मार्गदर्शक ठरते, यावरुन डॉ.आंबेडकरांच्या द्रष्टेपणाची, बुद्धिमत्तेची

कल्पना आपल्याला येते. इतर पाश्चात्य देशात स्त्रियांना व गरीबांना मतदानाचा अधिकार फार उशिरा मिळाला.[५] पण डॉ.आंबेडकरांनी प्रौढ मतदान पद्धतीचा स्वीकार करायला लावला व भारतीय लोकशाहीचा पायाच त्यांनी याप्रकारे भक्कम केला. प्रशासकीय अधिकाऱ्यानां त्यांचे कार्य नीट करता यावे यासाठी त्यांच्या सेवशर्ती, नेमणूक याबाबत राज्यघटनेतच तरतूद करुन त्यांना डॉ.आंबेडकरांनी निर्भयपणे काम करण्याचे स्वातंत्र्य दिले.

आज भारतीय लोकशाहीच्या कसोटीचा काळ सुरू आहे. आजुबाजूची परिस्थिती पाहिली तर असे वाटते, की भारतीय लोकशाहीला भारतीय जनताच तर नाकारणार नाही ना? स्वतंत्र भारतातील लोकशाहीविषयी चिंतन करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात की, 'जोपर्यंत इंग्रज सरकार होते, तोपर्यंत आपल्या देशात चांगल्या वाईट गोष्टींची जबाबदारी आपण त्यांच्यावरच टाकत होतो. पण आता आपण स्वतंत्र झाल्यामुळे चांगल्या वाईट गोष्टींची जबाबदारी आपलीच राहणार आहे. त्यामुळे आपल्याला आता अधिक जबाबदारीने वागावे लागणार आहे.

अद्वितीय बुद्धिमत्ता, त्या आधारे स्वत: घेतलेले अति उच्च दर्जाचे शिक्षण; जागतिक दर्जाची विद्वता, बंडखोरी व क्रांतिकार्य करण्याची प्रवृत्ती, संघटन कौशल्य, शिस्तबद्धता व नीटनेटकेपणा, वकृत्त्व, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्त्व, प्रचंड वाचन, संशोधनात्मक अभ्यास, अभ्यासपुर्ण व प्रेरणादायी लेखन... अशा अनेक गुणविशेषांसह हजारो वर्षांची गुलामगिरी नष्ट करणारे 'राज्यघटनेचे शिल्पकार', 'अस्पृश्योद्धारक' असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ६ डिसेंबर १९५६ ला हे जग सोडून गेले. पंडीत जवाहरलाल नेहरू आंबेडकरांच्या महापरीनिर्वाणानंतर संसदेत बोलताना म्हणतात, "Dr. Babasaheb Ambedkar was a symbol of revolt against all oppressive features of the Hindu Society."[७] या वाक्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवाधिकाराच्या कार्यचे स्पष्टपणे मुल्यमापन होते असे मला वाटते.

**समारोप :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या सर्व मुल्यांचा समावेश घटनेमध्ये त्यांना होणाऱ्या विरोधामुळे शक्य झाले नाही. नगण्य, सामान्य, शोषीत, पीडीत, आदिवासी, भटके विमुक्तजन आणि स्त्रिया हया महान देशाच्या स्वातंत्र्याचे वाटेकरी आहेत त्या प्रत्येकाला एक मत एक मूल्य हा मूलभूत अधिकार त्यांनी दिला. बाबासाहेबांना भारताच्या घटनेत आणखी काही अधिकार मुलभूत अधिकार म्हणून देण्याची इच्छा होती त्याविषयी बोलताना रा.सु.गवई म्हणतात, Dr. Ambedkar made It amply clear that for the privileged persons, Fundamental Rights are the assets and for the under privileged, they had only ornamental value. He therefore wanted to incorporate in to the Constitution some of the other rights which should be treated as Fundamental Rights, along with the existing Fundamental Rights. These were: rights related to provision for adequate means of livelihood to all Citizens, proper distribution of the material resources of the community for the common good, prevention of concentration of wealth to the common detriment, equal pay for equal work for both men and women, right to work, right to education, free and compulsory education to all children up to the age of 14 years, a living wage, a decent standard of living, uniform civil code, special care for promoting the educational and economic interests of the weak sections of the society, especially Scheduled Castes and Scheduled Tribes. These rights basically related to the social and economic transformation of our society."[८] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातीभेदाचे चटके लहापणापासूनच सोसलेले होते. त्यांचा हा लढा अस्पृश्यतेच्या विरोधातील लढा असे वरकरणी वाटत असले तरी तो खऱ्या अर्थाने मानव मुक्तीचा लढा होता. स्वातंत्र्य समता व बंधुत्व हया मुल्यांच्या शोधात तो होता. जातीनिर्मुलनाची ती प्राणपणाची लढाई होती.त्यामुळे धर्म, धर्मग्रंथ, पुरोहीत, कर्मकांड, पुर्वजन्म, दैववाद हया वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थांना चिरंजिव करणाया मुळावरच त्यांनी घाव घातला. खया अर्थाने मानवी अधिकार या सर्वांना मिळवून देण्यासाठी त्यांचे नाव इतिहासात सुवर्णअक्षराने कोरले जाईल.

**संदर्भ :**


1. Zelliot Eleanor, MAHAR AND NON-BRAHMIN MOVEMENT IN MAHARASHTRA. Vol. 7 Princeton: Princeton University Press, 1986, Page No.398
2. श्री.पवार दया, (संपा.)डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, संपादकीय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ,१९९३, पृ.७३
3. DR.BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 1, ANNIHILATION OF CASTE WITH A REPLY TO MAHATMA GANDHI, Dr.Ambedkar Foundation Ministry Of Social Justice. Empowerment, Govt. Of India 1944, Page No.47.
4. Dhanajay Keer, Life and Mission of Dr.Babasaheb Ambedkar, Popular Prakashan, Bombay, 1971, Page No.304
5. श्री.पवार दया, (संपा.)उपरोक्त, पृ.४
6. DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL.1, Ibid, Page No.34
7. Ibid, Page No.8
8. SUDARSHAN AGARWAL, Edited, Dr. B.R. AMBEDKAR The Man and His' Message A Commemorative Volume. R.S.Gavai, The Indomitable Babasaheb, Published for the Rajya Sabha Secretariat, New Delhi, Page No.173.